



REGISTERED No. B. 342

# अर्थ

वर्ष १५ — पुणें, बुधवार तारीख ४ मे, १९४९ — अंक १८

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

**ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.**

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं; हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादीसाठीं चौकशी करा:—

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

५, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG — फोन : ३४५१९

**औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें**

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ( ले :—. रेवि ॲले, किं. २ रु. )

( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स ( ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )

**दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.**

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर

वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,०००रु वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ पॅटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कडाक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ), ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०१ वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर, पुणें शाखा. ( बुधवार चौक )

डी. डी. देशपांडे, बी. ए. मॅनेजिंग डायरेक्टर.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें




माणिक नं. 20 कपड्याकरितां उत्तम साबण

माणिक सोप वर्क्स ...कराड, (सातारा)...

## सर्व प्रसिद्ध माल

ओगले यांचीं टंब्लर्स, पेले, लेमन स्क्वीझर्स, पेट्रोमॅक्स ग्लोब्स, तांब्याभांडीं, चिमण्या, बाटल्या व शास्त्रीय उपकरणें इत्यादि कांच माल.

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**हिंदुस्थानांत नवे ब्रिटिश कारखाने**—हिंदुस्थान सरकारनें बऱ्याच ब्रिटिश कंपन्यांना हिंदुस्थानांत कारखाने उघडण्याच्या तात्पुरत्या सवलती दिल्या आहेत असें समजतें. मद्रासमध्यें बी. एस. ए. ह्या कंपनीला कारखाना काढण्याची परवानगी देण्यांत आली आहे. हा कारखाना दरवर्षी १ लाख सायकली उत्पादन करूं शकेल. त्याचप्रमाणें स्लॅझेन्जर्स ह्या कंपनीला खेळांचें साहित्य निर्माण करण्यासाठीं एक कारखाना काढण्याची परवानगी मिळाली आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्या एका कंपनीला माती खणून बाजूला करण्याचीं यंत्रें तयार करण्याचा कारखाना उभारूं देण्यांत येणार आहे. ह्या यंत्रांचा रस्ते आणि धरणें बांधण्याच्या कामीं फार उपयोग होतो. ह्या सर्व कारखान्यांवर स्थानिक कामगारांना शिक्षण देण्याची अट घालण्यांत आली आहे. परदेशी कंपन्यांना केवळ आयात-निर्यातीचे परवाने मात्र देण्यांत आलेले नाहींत; कारण हिंदुस्थानांत भांडवल आणि कुशल कामगार ह्यांची वाण नाहीं.

**सहकारी संस्था आणि समाज**—बॉंबे प्रॉव्हिन्शिअल कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटतर्फे सहकारी चळवळीसंबंधीं २८ व्याख्यानांचें एक सत्र नुकतेंच पार पडलें. ह्या व्याख्यानांपैकीं शेवटचें व्याख्यान मुंबई सरकारचे फडणीस, श्री. व्हो. एल. मेहता ह्यांनीं दिलें. समाजाला स्थैर्य, न्याय आणि कार्यक्षमता ह्यांची प्राप्ती व्हावयाची असेल तर सहकार एवढाच एक मार्ग आहे असें त्यांनीं सांगितलें. प्रांतांतील सहकारी चळवळीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं सहकारी चळवळीविषयीं लोकांना वाटणारी आस्था आणि सरकारी साह्य ह्यांच्यामुळें चळवळीनें प्रगति केली. सहकारी चळवळींत समाजाचा कायापालट करण्याची शक्ति असल्यामुळेंच काँग्रेसनें त्या चळवळीला आपल्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान दिलें, असाहि अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला.

**मद्रासच्या गव्हर्नरांची दानबुद्धि**—मद्रास प्रांताचे गव्हर्नर म्हणून भावनगरच्या महाराजांची नेमणूक झाल्यापासून त्यांना दरमहा ५,५०० रुपये पगार मिळतो. परंतु ह्या वेतनापैकीं एकही पै त्यांनीं स्वतःच्या खर्चासाठीं न वापरतां, मद्रास प्रांतांतील व शहरांतील उपयुक्त संस्थांना मदत करण्यांत ते सर्व पैसे खर्च करतात असें समजतें.

**हिंदी डॉक्टरचा सन्मान**—कलकत्ता येथील एका मेडिकल कॉलेजमधील प्राध्यापक डॉ. हिमें चतर्जी ह्यांची शारीरशास्त्र-विषयक फ्रेंच वैद्यक संस्थेवर निवड करण्यांत आली आहे. पॅरिसमध्यें संशोधनकार्य करून नंतर डॉ. चतर्जी अधिक अभ्यासासाठीं एडिंबरोला जाणार आहेत.

**बटाट्याच्या बेण्यासाठीं शीतगृह**—बटाट्याची लागवड करण्याच्या वेळीं उपयोगी पडावें म्हणून बटाट्याचें बेणें टिकविण्याकरितां एक शीतगृह उभारण्याचें ओरिसा सरकारनें ठरविलें आहे. हें शीतगृह कटक जवळ उभारण्यांत येणार असून त्याला ५ लाख रुपये खर्च येईल. शीतगृहांत १५ लाख टन बटाट्याचें बेणें टिकवितां येण्याची सोय होईल.

**रेशमाच्या धंद्याला संरक्षण**—टॅरीफ बोर्डानें हिंदुस्थानांतील रेशमाच्या धंद्याबद्दल केलेल्या शिफारसींत आयात रेशमावरील कर वाढविण्याची सूचना केली आहे. ह्या धंद्याला आणखी तीन वर्षें संरक्षण द्यावें असें बोर्डाचें मत आहे. हिंद सरकारनें ह्या शिफारसी मान्य केल्या असून त्याप्रमाणें अधिकृत पत्रक काढण्यांत येईल.

**अमेरिकेंत आरोग्यरक्षक विमा**—अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रुमन ह्यांनीं राष्ट्रीय आरोग्यासाठीं एक विमायोजना तयार केली असून तिला अमेरिकन काँग्रेसची मान्यता मिळविण्याच्या खटपटींत त्यांचें सरकार आहे. सरकारपक्षीयांनीं ह्यासंबंधीच्या कायद्याचा मसुदा नुकताच काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांपुढें मांडला. ह्या आरोग्य-रक्षक विमा योजनेसाठीं ६,००,००,००,००० डॉलर्स खर्च येणार आहे.

**नवें विमा बिल**—विम्याच्या कायद्यांत दुरुस्त्या सुचविणाऱ्या बिलाचा खर्डा आतां तयार झाला असून सध्या सरकारी अधिकारी आणि विम्याच्या धंद्याच्या प्रातिनिधिक संस्था ह्यांच्यांत त्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत, असें समजतें.

**मजूर-विषयक प्रश्नांचा अभ्यास**—बिहार सरकारनें मजूर विषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठीं ६ शिष्यवृत्त्या देण्याचें ठरविलें आहे. ह्या शिष्यवृत्त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांनीं मुंबई येथें राहून करावयाचा आहे. बिहारमधील विद्यार्थ्यांना मुंबई सरकारनें ह्यासंबंधीं शक्य त्या सवलती द्याव्या, असें बिहार सरकारनें मुंबई सरकारला सुचविलें आहे.

**युद्ध जवळ आल्याचा इषारा**—फ्रान्समध्यें आणि रशिआंत अमेरिकेचे वकील म्हणून काम केलेले, मि. विल्यम बुलिट ह्यांचें अमेरिकेंतील एका विद्यापीठांत नुकतेंच भाषण झालें. अमेरिका युद्धाच्या संनिध झपाट्यानें येत आहे, असा इषारा त्यांनीं आपल्या व्याख्यानांत दिला.

**निर्वासितांसाठीं नगर**—राजपुरा येथें ७०,००० निर्वासितांची कायमची सोय करण्यासाठीं एक नगर वसविण्यांत येत आहे. राजपुरा निर्वासित मदत-संस्थेतर्फे ह्या वसतीची असेरची योजना मंजूर करण्यांत आली आहे.

**अजमीरसाठीं ड्रेनेज**—अजमीर म्युनिसिपालिटीनें शहरांतील सांडपाण्याचा व घाणीचा निचरा करण्यासाठीं एक ड्रेनेजची योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेला ३०,००,००० रुपये खर्च येणार असून तिला मध्यवर्ती सरकारची मान्यता आतां मिळाली आहे.

**चित्रपट निर्माता दोषमुक्त**—जर्मनींतील प्रख्यात चित्रपट निर्माता व्हिटट हारुअन याला जर्मन कोर्टानें निर्दोषी ठरविलें. ज्यू जमातीविरुद्ध प्रचार करणारा चित्रपट निर्माण करून मानवतेविरुद्ध त्यानें गुन्हा केला, असा आरोप त्याचेवर ठेवण्यांत आला होता.

**इतिहासाचीं नवीं पुस्तकें**—पाकिस्तानांतील विद्यार्थ्यांना येत्या जूनपासून इतिहासाचीं नवीं पुस्तकें वाचावीं लागतील. पाकिस्तानच्या इतिहास मंडळानें हीं पुस्तकें मुद्दाम मंजूर केलीं असून दरम्यान इतिहासाचीं नवीं पुस्तकें खरेदी करण्यांत येऊं नयेत, अशा सूचना जाहीर केल्या आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ४ मे १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## वैद्यानें औषध सांगितलें, पण तें घेतलें पाहिजे ना !

हिंदुस्थानांतील अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याचे कामीं हिंद सरकारला सल्ला देण्यासाठी सरकारच्या निमंत्रणावरून लॉर्ड जॉन बॉइड ऑर हे हिंदुस्थानांत आले होते. सुमारें तीन आठवडे ते येथें राहिले. आपला अहवाल तयार करून ते रविवार ता. २० एप्रिल रोजीं परत गेले. हा अहवाल पंडित नेहरूंना सादर करण्यांत येईल. हिंद सरकारनें आखलेल्या योजना योग्य तऱ्हेच्या आहेत असा त्यांनीं अभिप्राय व्यक्त केला असला, तरी त्यांचे संबंधांत तांतडीनें निर्णय घेऊन योजना यशस्वी करण्याचें अगत्य प्रतिपादण्यास ते विसरले नाहींत. भयंकर युद्धामध्यें हिंदुस्थान सापडलेला आहे, अशा जाणीवेनें कृति झाली पाहिजे, असें त्यांनीं सांगितलें आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं एकजुटीनें प्रयत्न केले पाहिजेत आणि जनतेनेंहि त्यांस उत्साहानें हातभार लावला पाहिजे, ही गोष्टहि त्यांनीं स्पष्ट केली. १९४० सालीं ग्रेट-ब्रिटनची जी गंभीर परिस्थिति झाली होती, तीच आज हिंदुस्थान अनुभवीत आहे. त्यावेळीं प्रत्येक इंग्रज कुटुंब स्वतःस लागणाऱ्या अन्नाचा कांहीं भाग तरी लागवड करून उत्पादन करीत असे. अशाच तऱ्हेचा व्यापक प्रयत्न येथेंहि झाला पाहिजे, ह्यांत संशय नाहीं. दुर्दैवानें, ह्या प्रश्नाच्या गांभीर्याकडे जनतेनें जेवढें लक्ष द्यावयास पाहिजे, तेवढें ती देत नाहीं आणि सरकारी योजना कागदोपत्रींच राहून प्रत्यक्ष उत्पादनवाढ पदरीं पडत नाहीं. मुंबई प्रांतापुरतें पाहिलें, तर १९४९–५० मध्यें प्रांताचें उत्पादन सव्वादोन लक्ष टनांनीं वाढविण्याचा प्रांतिक सरकारचा मानस आहे आणि १९५०–५१ मध्यें सव्वातीन लक्ष टनांची भर घालण्याचा त्याचा विचार आहे.

१९५१ अखेर देश अन्नधान्याचे बाबतींत स्वावलंबी करण्याच्या धोरणास अनुसरूनच हा कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. परंतु, प्रत्यक्ष कृतींत तो उतरण्याचे मार्गांतील अडचणी, किती सत्वर दूर होतील, ह्यावरच त्याचें यश अवलंबून राहील हें उघड आहे. अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याविषयीं कितीहि उत्कृष्ट सल्ला तज्ज्ञानें दिला, तरी त्याप्रमाणें प्रत्यक्ष कृति झाली नाहीं, तर अपेक्षित फलप्राप्ती कशी होणार ? हिंदुस्थाननें अन्नधान्याचा प्रश्न सोडविल्यासिवाय, औद्योगीकरणाचे व पुनर्घटनेचे प्रश्न त्यास हातीं घेतां येणार नाहींत, निदान त्यांकडे पुरेसें लक्ष देतां येणार नाहीं. हिंदुस्थानाप्रमाणें जगांतील इतर देशांनाहि डॉलरची हुंडणावळ मिळविणें कठीण जात आहे; तेव्हां हिंदुस्थानसारख्या देशास मोठ्या प्रमाणावर भांडवली मदत देण्यास अमेरिकेला केव्हांहि शक्य होईल. परंतु, ती घेण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानास प्राप्त होण्यासाठींहि अन्नधान्याचा प्रश्न आधीं सुटणें अगत्याचें आहे.

---

### आफ्रिकेंतील वसाहतींची वाढ

ब्रिटिश वसाहतींचा उत्पादनाच्या दृष्टीनें जास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें अलिकडे ब्रिटनचे कांहीं प्रयत्न चालू आहेत. ह्या दृष्टीनें विशेषतः आफ्रिकेंतील वसाहतींचा विशेष उपयोग करतां येण्यासारखा आहे. वसाहतींच्या प्राथमिक उत्पादन कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यावरून असें दिसतें कीं, कांहीं आवश्यक गोष्टींचें उत्पादन वसाहतींत करण्याबद्दल विशेष भर दिसून येतो. तेलबिया, स्टार्च, इमारती लाकूड, कागदाचा लगदा, तंबाखू व कातडी कमावण्याला लागणारे पदार्थ यांचें उत्पादन वाढवितां येणें शक्य आहे. नायजीरिया, गँबिया, टँगॅनिका, युगँडा, न्यासालँड या ठिकाणीं भुइमुगाचें उत्पादन गेल्या एकदोन वर्षांत निदान २५ टक्क्यांनीं तरी वाढलें आहे. तंबाखूचेंहि उत्पादन ५० टक्क्यांनीं वाढणें शक्य आहे.

अंतराच्या दृष्टीनें आफ्रिकेंतील वसाहती इंग्लंडला जवळ आहेत. हिंदुस्थान, ब्रह्मदेश, सीलोन हे देश स्वतंत्र झाल्यामुळेंहि ब्रिटनला आतां आफ्रिकन वसाहतींचा उत्पादनाच्या दृष्टीनें विकास करणें अगत्याचें झालें आहे. नवीन भांडवल गुंतविण्याच्या दृष्टीनेंहि आफ्रिकेंतील स्वतःच्या मालकीच्या वसाहती ब्रिटिश भांडवलदारांना केव्हांहि फायदेशीर आहेत. ब्रिटनची परिस्थिति आतां सुधारत आहे.

### डनलॉप रबर कंपनी ( इंडिया ) लि.

१९४८ सालीं वरील कंपनीनें ८ कोटी, १५ लक्ष रुपयांची विक्री करून १ कोटी १३ लक्ष रुपये नफा मिळविला. भागीदारांना ४०% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. "शिलकी मालाची किंमत कमींत कमी लावण्यांत आली आहे. संशयित व बुडीत कर्जाची भरपूर तरतूद करून, समजून आलेल्या सर्व नुकसानांची व्यवस्था झालेली आहे." कंपनीचें शेअर भांडवल १ कोटी, २० लक्ष रुपये असून रिझर्व्ह व इतर फंड १½ कोटी रुपयांचे आहेत.

### पुणें इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.

ह्या कंपनीस १९४८ सालीं ५,३७,५७८ रु. नफा झाला. कंपनीचीं गिऱ्हाइकें, जोडलेले दिवे व यंत्रें, विक्री व विक्रीचें उत्पन्न, ह्यांचा तपशील खालीं दिला आहे.

| वर्ष | गिऱ्हाइकांची संख्या | जोडलेले दिवे व यंत्रें ( कि. वॅ ) | विकलेली वीज ( यूनिट ) | वीजविक्रीचें उत्पन्न ( रु. ) |
|---|---|---|---|---|
| १९४५ | १६,८०० | १६,४८८ | २,७१,६०,०४० | २२,९३,५७४ |
| १९४६ | १७,७५५ | १७,२८२ | २,६१,५२,०४२ | २३,२३,८८० |
| १९४७ | १९,३७३ | १९,८४५ | ३,०४,०८,१३० | २५,७८,५०६ |
| १९४८ | २१,५१५ | २३,६१६ | ३,५३,३५,५६० | २९,३२,१३६ |

### कावेरी पेपर मिल्स अँड फॉरेस्ट इंडस्ट्रीज लि.

कुर्गमध्यें कागदाची गिरणी काढण्यासाठीं वरील कंपनी स्थापन झाली आहे. कावेरी नदीचे कांठीं कारखाना उभारण्यांत येईल.

## कंपनी कायद्यासंबंधीं अलाहाबाद हायकोर्टाचा ताजा निर्णय

**भाग जप्तींतून नवें ऋण व नवी मुदत.**

भगवतीप्रसाद ह्या नांवाच्या गृहस्थांनीं शिरोमणी शुगर मिल्स लि. ह्या कंपनीच्या प्रत्येकी १०० रुपयांच्या ५० भागांसाठी २५० रुपये भरून ता. १ आक्टोबर १९३३ चा अर्ज केला होता व त्याप्रमाणें कंपनीनें त्यांना ५० भाग मंजूर करून दिले होते. परंतु पुढें भगवतीप्रसाद ह्यांनीं भाग रकमेच्या मागण्या (कॉलस) पुऱ्या केल्या नाहींत म्हणून कंपनीनें त्यांना ७ एप्रिल १९३९ तारखेची अशी नोटीस पाठविली कीं, त्यांना कंपनीला सदर ५० भागांबद्दल (१) अर्जाबरोबरचे उरलेले ७५० (२) भाग मंजुरीनंतरचे १५०० (३) पहिल्या मागणीचे १५०० (४) दुसऱ्या मागणीचे १००० असें मिळून ४७५० व मागणी-रकमा थकविल्याबद्दल व्याज २०६७–८ मिळून एकूण ७८१७ रु. ८ आणे विशिष्ट मुदतींत भरावेत; अन्यथा ते भाग जप्त होतील. भगवतीप्रसाद ह्यांनीं पैसे भरले नाहींत. तेव्हां कंपनीच्या डायरेक्टरांच्या उपसमितीनें ठराव करून ५ मे १९३९ रोजीं त्यांचे ते ५० भाग जप्त केले. पुढें कंपनी लिक्विडेशनमध्यें निघाली तेव्हां ऑफिशियल लिक्विडेटर ह्यांनीं वरील ७८१७–८–० रु. ची रकम वसूल करण्यासाठी भगवतीप्रसाद ह्यांजवर ४ मे १९४२ रोजीं दावा दाखल केला व अखेरीस तें प्रकरण अलाहाबाद हाय-कोर्टापुढें आलें. भगवतीप्रसाद ह्यांनीं पहिला आक्षेप असा घेतला कीं, त्यांच्या ५० भागांच्या अर्जाबरोबर भरावयाचे ७५० रुपये हे १५ डिसेंबर १९३३ रोजीं व भागमंजुरीबाबतचे १५०० रुपये २५ जानेवारी १९३४ रोजीं देणें झाले होते. त्या रकमांची मागणी ७ एप्रिल १९३९ रोजीं तीन वर्षांच्या मुदतीबाहेर गेली होती. अशाप्रकारें कांहीं रकमा मुदतीबाहेर गेलेल्या व कांहीं मुद-तींत असलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या रकमांची गल्लत करून कंपनीनें ७ एप्रिल १९३९ ची भागजप्तीची (शेअर फॉर्फिचरची) नोटीस दिलेली असल्यामुळें ती बेकायदेशीर आहे. शिवाय, डायरेक्टर बोर्डाचे उपसमितीनें जप्तीचा ठराव केला आहे; सर्व बोर्डानें ठराव केलेला नाहीं. म्हणून तो ठरावहि बेकायदा आहे. अलाहाबाद हायकोर्टानें भगवतीप्रसाद ह्यांचे हे आक्षेप मान्य केले नाहींत. ७ एप्रिल १९३९ रोजीं उल्लेखित दोन रकमा वसूल करण्याचा मार्ग मुदतीबाहेर गेला होता हें खरें; परंतु म्हणून त्या रकमा येथें राहिल्याच नव्हत्या असें ठरत नाहीं. मुदतीच्या कायद्यानें वसुलीचा मार्ग बंद होता; मूळ-येणें कांहीं नाहींसें होत नाहीं; सबब भाग जप्तीच्या नोटिशींत त्या रकमा अंतर्भूत करावयास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें भागजप्ती-करितां उपसमितीनें केलेला ठराव पुरेसा आहे असेंहि अलाहाबाद हायकोर्टानें ठरविलें. कंपनी कायद्याखालीं विशिष्ट प्रकारचीं ठरीव कामें करावयासाठी डायरेक्टरांना आपल्या उपसमित्या सोयीसाठी नेमतां येतात असें हायकोर्टानें प्रमाण धरलें. त्यानंतर भगवतीप्रसाद ह्यांनीं असा आणखी एक मुद्दा काढला होता कीं, लिक्विडेटर ह्यांचा सर्व दावाच मुदतीबाहेर आहे. परंतु हायकोर्टानें हाहि मुद्दा अमान्य केला. भागजप्तीच्या तारखेपासून दाव्याला नवें कारण उत्पन्न होतें. त्या भागजप्तीनंतर भागदार म्हणून नव्हे तर कंपनीचें देणेदार म्हणून भगवतीप्रसाद हे कंपनीचे देणें लागतात. भागजप्तीपासून एक नवीनच ऋण उत्पन्न होतें. सबब भागजप्तीनंतर ३ वर्षांचे आंत दाखल करण्यांत आलेला सदरील दावा योग्य मुदतींतच आहे असें हायकोर्टानें ठरविलें. अशाप्रकारें (१) भागजप्तीच्या नोटिशीनें भागरकमांपैकीं मुदतीबाहेर गेलेल्या मागण्यांचीहि रकम मागवितां येते; (२) भागजप्तीचा ठराव डायरेक्टरांच्या उपसमितीस करावयास अधिकार देतां येतो आणि (३) भागजप्तीपासून नवीन ऋण व नवीन मुदत सुरू होते; असे तीन महत्त्वाचे मुद्दे ह्या निर्णयानें अलाहाबाद हायको-र्टानें स्पष्ट केले आहेत.

—ए. आय्. आर. १९४९ अलाहाबाद १९५.

## कांहीं बँकांच्या व्यवहाराचे ताजे आकडे

(३१ डिसेंबर १९४८. लक्ष रुपये.)

| | भांडवल | रिझर्व्ह फंड | ठेवी | ताळेबंदाची बेरीज | ठेवींशीं कर्जाचें प्रमाण % | ठेवींशीं इन्व्हेस्टमेंटचें प्रमाण % | ठोक नफा | डिव्हिडंड % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ५६२ | ६२७ | २८०२९ | ३०६१५ | ३४.९ | ५७.५ | ४७० | १४ |
| सेंट्रल बँक | ३१४ | ३६६ | १३२२४ | १५१९० | ३७.५ | ५१.० | १५५ | १४ |
| बँक ऑफ इंडिया | १९९ | २४९ | ६६२९ | ७४०७ | ४२.४ | ५३.३ | ७४ | १४ |
| पंजाब नॅशनल बँक | ८७ | १०० | ५५०३ | ६५३४ | ५१.५ | ३४.५ | ५५ | ६ |
| बँक ऑफ बरोडा | १०० | १०५ | ३५०५ | ३८६६ | ४२.१ | ४७.२ | २७ | १२ |
| युनायटेड कमर्शिअल बँक | २०० | ४५ | ३८२४ | ५१८४ | ३३.६ | ६७.४ | ३६ | ३ |
| कलकत्ता नॅशनल बँक | ५० | २५ | ४४८ | ५६६ | ६३.४ | २२.९ | ६ | ६.२५ |
| बँक ऑफ म्हैसूर | ५० | ८३ | ११०४ | १२६० | ६२.९ | २७.० | १५ | १६ |
| इंडियन ओव्हरसीज बँक | ३७ | १० | ८४३ | १०९३ | ३६.२ | ४९.१ | ७ | ४.५ |
| कॅनरा बँक | २९ | ११ | ६०२ | ७५३ | ४५.९ | ४१.४ | ६ | ९ |
| बँक ऑफ भोपाळ | १२ | ३ | १३५ | १७१ | ४२.० | ५५.१ | १ | ३ |
| इंडियन बँक | ५३ | ६२ | १७६२ | २४५६ | ५०.२ | ६०.२ | १३ | १२ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | १६ | ३.६ | १८९ | २१८ | ५१.३ | ४४.९ | २.५ | ५ |
| न्यू सिटिझन बँक | १०.४ | २.१ | २८२ | ४०४ | ४९.० | ५२.० | ०.८ | — |
| प्रेसिडन्सी इं. बँक | ७.२ | .९४ | ५९ | ७१ | ५७.६ | ३५.६ | ०.७ | ३.५ |

## ब्रिटनचें अंदाजपत्रक

(भा. म. का.)

पुढील वर्षीचें ब्रिटनचें अंदाजपत्रक सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं एप्रिलच्या सुरवातीस पार्लमेंटला सादर केलें. ब्रिटनचें पूर्वीचे अर्थमंत्री डॉ. डाल्टन हे असल्यामुळें व त्यांचीहि आर्थिक प्रश्नांबद्दल एक विवक्षित दृष्टि असल्यामुळें क्रिप्स ह्यांचें अंदाजपत्रक बारकाईनें चिकित्सिलें जातें. डाल्टन अर्थमंत्री असतांना ब्रिटनला मार्शल मदतीचा फायदा मिळत नव्हता व युद्धानंतरच्या तीव्र परिस्थितीला त्यांना तोंड द्यावयाचें होतें. गेल्या तीन चार वर्षांत आर्थिक परिस्थिति हळूहळू सुधारत आहे व त्याचा फायदा सध्यां क्रिप्सना मिळाला आहे, ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाहीं. प्रस्तुत अंदाजपत्रकाच्या बाबतींत असें म्हणतां येईल कीं निर्गत व्यापाराचें धोरण व औद्योगिक भांडवलाची गुंतवणूक ह्यामुळें आर्थिक परिस्थिति सुधारत चालली आहे. मजूर संघटना व धंद्याचा मालक वर्ग ह्यांच्यावर जरूर तितके कर बसविण्याची तयारी पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत पूर्णपणें दिसून येते. क्रिप्स ह्यांची भूमिका दुहेरी स्वरूपाची आहे. ते अर्थमंत्री असूनहि आर्थिक पुनर्घटना मंत्रीहि आहेत. या नात्यानें एका बाजूला त्यांना अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्याचा अधिकारहि प्राप्त होतो व दुसऱ्या बाजूला अर्थ-व्यवस्थेमध्यें इतर जरूर ती तरतूद करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

अंदाजपत्रकांत शिल्लक राहील या गोष्टीकडे पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकांत विशेष भर देण्यांत आला आहे. पुढील वर्षाची एकंदर अंदाजी शिल्लक सामान्य जमाखर्चाचे व भांडवली हिशेबाचे आंकडे जमेस धरून, १·४ कोटी पौंड आहे. गेल्या वर्षाचा हाच आंकडा ३५·२ कोटी पौंड होता. क्रिप्स ह्यांना अंदाजपत्रक तयार करतांना चलनविस्ताराच्या परिस्थितीला तोंड द्यावयाची तरतूद ठेवावयाची होती, व त्याच बरोबर कदाचित् चालू वर्षअखेर चलन संकोचाच्या संभाव्य परिस्थितीलाहि थोडेसें तोंड देण्याची व्यवस्था करावयाची होती. एकंदर परिस्थितीच्या दडपणामुळें अन्नाच्या व्यवस्थेवरील खर्च व आरोग्य खात्यावरील खर्च ह्यामध्यें काटकसर करतां येणें शक्य नाहीं. अन्न खात्यावरील खर्च ४६·५ कोटी पौंड झाला असून, आरोग्य खात्यावरील खर्च २६·० कोटी पौंड झाला आहे. यामुळें साधारणपणें करांच्या बाबतींत म्हणण्यासारखी सवलत देणें अशक्य झालें आहे. यामुळें खरेदीवरील करांत सवलत देतां येणें अशक्य झालें. अंदाजपत्रकांत ज्या किरकोळ सवलती देण्यांत आल्या आहेत त्यांचा मुख्य उद्देश उत्पादनाच्या वाढीसाठीं उद्योगधंद्यांना उत्तेजन देणें हा आहे. यंत्रसामुग्रीच्या खरेदीवरील घसारा फंडाची रकम नवीन किंमतीच्या ४० टक्केपर्यंत करण्यांत आली आहे ही यंदांच्या अंदाजपत्रकांतील एक विशेष सवलत आहे, व तिचा उद्देश उत्पादनाला चालना देणें हा आहे.

युद्ध संपल्यानंतरच्या काळांत ब्रिटननें व्यापारांतील प्रतिकूल तफावत भरून काढण्यासाठीं उत्पादन वाढविणें, धंद्यांत गुंतविलें जाणारें भांडवल वाढविणें व अगदीं योग्य त्या ठिकाणींच करविषयक सवलती देणें ह्या गोष्टींवर विशेष भर दिला. ब्रिटनमध्यें अंदाजपत्रकांतील व्यवस्था व आर्थिक परिस्थितींत सुधारणा ह्या गोष्टी यशस्वी होतात! ह्याचें मुख्य कारण म्हणजे तेथील सरकारला गेल्या चार वर्षांत जनतेचा भरभक्कम पाठिंबा मिळाला आहे, हें होय. विशेषतः गेल्या दोन वर्षांत सर स्टॅफोर्ड क्रिप्स ह्यांनीं शक्य करून दाखविलेल्या गोष्टी अतिशय परिणामकारक स्वरूपाच्या आहेत, व त्यामुळें युद्ध-काळांत ब्रिटनची कोलमडून पडलेली अर्थव्यवस्था पूर्णपणें सावरली गेली आहे.

## हिंद व आस्ट्रेलिया ह्यांचे व्यापारी संबंध

हिंद व ऑस्ट्रेलिया यांचे परस्पर संबंध दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीपासून एकमेकांच्या दृष्टीनें जास्त जवळचे येत चालले आहेत. कारण, दुसऱ्या महायुद्धांत स्थापन झालेल्या ईस्टर्न ग्रुप सप्लाय कौन्सिलच्या कार्यामुळें युद्ध-प्रयत्नांच्या दृष्टीनें हे संबंध जवळचे आले. महायुद्धामध्यें व नंतर जागतिक व्यापाराला लागलेल्या निराळ्या वळणामुळेंहि हिंदला ऑस्ट्रेलियन आयातीची जास्त जरुरी लागूं लागली व ऑस्ट्रेलियालाहि हिंदमधून आयात करणें सोइस्कर पडूं लागलें. जपानचें महत्त्व महायुद्धांत कमी झालें. चीन, ब्रम्हदेश व इंडो-चायना येथील परिस्थिति तेथील अंतर्गत अडचणींमुळें विशेषशी समाधानकारक नाहीं. यामुळेंहि सध्यां आशिया खंडांत स्वतंत्र हिंद व ऑस्ट्रेलिया यांचे परस्पर संबंध जवळचे आले आहेत. जुलै १९४८ पासून जानेवारी १९४९ पर्यंतच्या सात महिन्यांत हिंदचा ऑस्ट्रेलियाशीं अनुकूल तफावत दर्शविणारा व्यापार दोन कोटी रुपये किंमतीचा झाला. त्याच्या पूर्वीच्या वर्षाच्या त्याच सात महिन्यांच्या व्यापारांतील हिंदचे दृष्टीनें अनुकूल तफावत सात कोटी रुपये होती. हिंदशीं अनुकूल तफावत पांच कोटींनीं घटण्याचें कारण गेल्या वर्षांत ऑस्ट्रेलियांतून खरेदी केलेला जादा गहूं होय. जगाच्या इतर देशांशीं चालणारा ऑस्ट्रेलियाचा व्यापार विचारांत घेतला असतां, ऑस्ट्रेलियाला परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत रहाते. ही अनुकूल तफावत दिसून येण्याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे महायुद्धानंतर अन्नधान्याच्या किंमतींत झालेली वाढ हें होय. लौकरच धान्याचे बाजारभाव उतरूं लागल्यास इतकी मोठी अनुकूल व्यापारी तफावत ऑस्ट्रेलियाला रासतां येणार नाहीं. हिंद व ऑस्ट्रेलिया यांच्यामध्यें देवाण-घेवाण स्वरूपाचा व्यापारी करार होणें दोनहि देशांच्या परिस्थितीमुळें फायदेशीर ठरेल.

---

## तंबाखूचा प्रश्न—इंडियन सेंट्रल कमिटीची सभा

हिंदी मध्यवर्ती तंबाखू कमिटी तंबाखूचें उत्पादन व तंबाखूची विक्री वाढविणें या बाबतींत प्रयत्न करीत असते. ह्या कमिटीचें आठवें अधिवेशन मद्रासला नुकतेंच भरलें होतें. तंबाखूच्या लागवडीबद्दलच्या प्रश्नांचा या बैठकींत विचार करण्यांत आला. सदरहू कमिटीचें विशेष लक्ष संशोधन करण्याच्या गोष्टींकडे असतें. निरनिराळ्या तंबाखूच्या निरनिराळ्या पंधरा योजनांवर ही कमिटी खर्च करीत आहे. सध्यां तंबाखूच्या लागवडीखालील क्षेत्र दहा लक्ष एकर असावें. तंबाखूचें एकंदर उत्पादन १५ कोटी रुपये किंमतीचें आहे. तंबाखूला निर्गत व्यापाराच्या दृष्टीनें महत्त्व असल्यामुळें परराष्ट्रीय चलन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेंहि ह्या पिकाला महत्त्व आहे. मध्यवर्ती कमिटीनें युरोप व ब्रिटन येथील बाजारपेठांचें संशोधन करण्यासाठीं एक अधिकारी नेमला आहे. पाश्चिमात्य बाजारपेठ आपल्या तंबाखूला काबीज करतां येईल, असा अंदाज आहे. गुंटूर जिल्ह्यांत तंबाखूचें पीक विशेष असल्यामुळें तेथील पिकाच्या उत्पादनाच्या परिस्थितीबद्दलच्या परिस्थितीचें कमिटीनें निरीक्षण केलें. तंबाखूची लागवड करणाऱ्या शेतकऱ्याला योग्य किंमत मिळावी म्हणून प्रस्थापित लिलावांच्या मार्गानें योग्य त्या दरानें विक्री करावी असें ठरविण्यांत आलें. तंबाखूमुळें प्रांतिक सरकारला कर मिळूं शकतो. तंबाखूपासून सिगारेट तयार करण्याचे कारखाने हिंदुस्थानांत जास्त प्रमाणांत निघण्यास वाव आहे.

---

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

### डायरेक्टरांच्या रिपोर्टातील कांहीं बाबी

( वार्षिक सभा : ३०–४–४९ )

श्री. भाऊसाहेब देशपांडे ह्यांनीं १९३७ सालीं स्थापन केलेल्या ह्या बँकेनें आपली प्रगति कायम ठेवली आहे. गेल्या वर्षी इतर कित्येक बँकांकडील ठेवी कमी झाल्या, तरी न्यू सिटिझनकडील ठेवी वाढून ताळेबंदाची बेरीज आतां ४ कोटी रुपयांवर गेली आहे. १९४६ अखेर बँकेच्या शाखांची संख्या ४७ होती, तींत वाढ न करताहि बँक आपल्या खेळत्या भांडवलांत २५ लक्ष रुपयांची भर घालूं शकली आहे. बँकांनीं आपल्या देण्याच्या २०% रकम रोख व तरती ठेवली पाहिजे, असा नवा बँकिंग कायदा सांगतो, तर न्यू सिटिझनच्या बाबतींत हें प्रमाण ३०% पेक्षां अधिक आहे. बँकेचें व्याजाचें उत्पन्न वाढत आहे. मालमत्तेच्या भाड्याचेंहि चांगलें उत्पन्न येत आहे. बोर्डाच्या सभांची फी कमी करून व मॅनेजिंग डायरेक्टर व इतर वरिष्ठ अधिकारी ह्यांना स्वखुषीनें कांहीं पगार बँकेस परत करण्याची विनंति करून, डायरेक्टरांनीं खर्चात शक्य ती काटकसर केली आहे. बँकेच्या कारभाराचा किफायतशीरपणा प्रतिकूल परिस्थितींतहि कायम राखण्यांत चालकांनीं दक्षता दाखविली आहे. सरकारी रोख्यांच्या किंमतींत मोठी घट झाली नसती व इन्कमटॅक्सच्या तरतुदीची कमी पडलेली रकम लिहून टाकणें जरूर पडलें नसतें, तर नफ्याची रकम मोठी दिसली असती. ५ हजार रुपये प्रॉव्हिडंट फंड रिझर्व्हमध्यें घालून बाकीचा सर्व नफा ( त्यांतून दोन वर्षांचा इन्कमटॅक्स द्यावयाचा ) पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल. बाकी राहिलेलें डिव्हिडंड येत्या एक–दोन वर्षांत भागीदारांना देता येईल, असा डायरेक्टरांना विश्वास वाटत आहे. ह्यासंबंधांतलि मागील चांगला अनुभव भागीदारांस आहेच.

सरकारी रोखे व शेअर्स ह्या दोन्हींच्या किंमतींत घट दिसत आहे, परंतु त्याबरोबर बँकेनें दर्शनी किंमतीचेपेक्षा कमी किंमतीस अल्प मुदतीचे कित्येक रोखे घेतले आहेत. ते वटविण्याचे वेळीं ७२,००० रु. वाढावा मिळणार आहे. बँकेच्या आर्किटेक्टनें गेल्या वर्षी बँकेच्या इमारतीचें मूल्यमापन ४,२७,००० रु. केलें, तें ताळेबंदांत दाखविलेल्या किंमतीपेक्षा पुष्कळच ज्यास्त आहे आणि ४½ लक्ष रुपयांपेक्षा अधिक किंमत त्या इमारतीसाठीं देऊं केली जात आहे. सेफ, फर्निचर इत्यादींसारख्या जिन्नसांची किंमत ताळेबंदांत घसारा काढून कमी लावली असली तरी तिला बाजारभाव चांगला आहे. थोडक्यांत म्हणजे, कांहीं बाबतींत किंमती कमी झाल्या असल्या तर कांहीं बाबतींत त्या वाढल्या आहेत आणि तूट वाढाव्यानें सहज भरून निघत आहे. अर्थात्, तूट व वाढावा दोन्हीहि प्रत्यक्ष पदरांत पडत नसल्यामुळें, तात्त्विक दृष्टीनेंच ही परिस्थिति समजावून सांगण्यांत येत आहे.

---

### स्टर्लिंग शिलक ६०० कोटी रुपयांनीं कमी झाली

जुलै, १९४८ ते मार्च १९४९ ह्या मुदतींत रिझर्व्ह बँकेच्या पौंडी जिंदगीमध्यें ६०० कोटी रुपयांची घट झाली. त्यापैकी ३०० कोटी रु. हिंदुस्थानांतील इंग्रज नोकरांच्या पगार–पेन्शनच्या देण्याची ॲन्युइटी घेण्यांत खर्च झाले आणि १५० ते २०० कोटी रुपयांचा विनियोग पाकिस्तानचा वाटा देऊन टाकण्याकडे करण्यांत आला. दैनंदिन खर्चापुरतें पाहिलें, तरी हिंदुस्थानचा पौंडी खर्च वाढत आहे. आयात मालावरील निर्बंध सैल केल्याचा हा एक परिणाम आहे.


# THE BHOR STATE BANK, LTD., BHOR

## NOTICE

Notice is hereby given that an Extra-ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank, Ltd., will be held at 515, Budhwar Peth, Poona on Sunday the 22nd May 1949 at 3 P. M. to consider and if approved to pass the following special resolutions.

(1) Resolved that Article No. 90 and 90 (a) of the Articles of Association be deleted and Article No. 90 (b) be numbered as 90.

(2) Resolved that Article Nos. 103 (b) (c) (d) and ( e ) of the Articles of Association be deleted and Article No. 103 (a) be numbered as 103.

(3) Resolved that the words " Other than Ex-officio or Nominated Director appearing in Article No. 107 of the Articles of Association be deleted.

(4) Resolved that " Rs. 5000/-" should be substituted for Rs. '2500/-' appearing in Article No. 107 in the Articles of Association.

(5) Resolved that Article No. 110 of the Articles of Association be deleted and the following be substituted therefor.

"If any Director have to travel from a distance to attend the meeting of the Board of Directors or its committee, the Directors may pay them such travelling expenses as may be fixed by them from time to time in addition to the fees for attending such meeting, as specified above."

(6) Resolved that the words " or an Ex-officio or Nominated Director " be deleted from Article No. 113 of the Articles of Association.

(7) Resolved that the words " Ex-officio and Nominated Directors " in Article No. 115 of the Articles of Association be deleted.

(8) Resolved that Article No. 129 of the Articles of Association be deleted and following Article be substituted therefor.

" The Directors may elect a Chairman and Vice-Chairman and determine the period of office, but if no such Chairman or Vice-chairman is elected or if at any meeting the Chairman or Vice-chairman is not present the Directors present may choose one of them to be the Chairman of such meeting."

By order of the Board.

BHOR, 20th April 1949.

R. G. AGASHE,
*Manager.*

N. B.—Share Transfer Books of the Bank will be closed from 18-5-49 to 25-5-49 ( Both days inclusive ).

## आसवें व अरिष्टें ह्यांजवर अन्याय्य कर

**पूना केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सूचना**

मुंबई सरकारनें औषधींच्या धंद्यावर नियंत्रण आणण्यासाठी विधिमंडळानें पसार केलेल्या ड्रग्ज कंट्रोल ॲक्टची अंमलबजावणी आतां जारीनें सुरू केली आहे. मद्यपानबंदीचा पूरक भाग म्हणून औषधीविक्रीच्या नव्या कायद्यानें द्राक्षासवादिक देशी औषधी-रसायनें विकावयास परवाना घेणें आवश्यक ठरविलें असून त्यांची फीहि जब्बर ठरविली आहे. द्राक्षासव व मेडिकेटेड टॉनिक वाइन्स ह्यांना पूर्वी फक्त वार्षिक २५ रुपये फी होती. नव्या कायद्याखाली सरकारनें १ एप्रिल १९४९ पासून ही फी अनपेक्षितपणें वाढवून जिल्ह्यांतील मुख्य शहरांत १५० रुपये आणि मुंबई, अहमदाबाद सोलापूर व पुणें ह्या शहरांत ५०० रुपये वार्षिक फी केली आहे. द्राक्षासवाबरोबरच इतर अन्य आसवें व अरिष्टें ह्यांचेहि विक्रीसाठी परवाना घेणें आतां आवश्यक झालें असून ह्यांचे व्यतिरिक्त कोलन वॉटर, लव्हेन्डर, वगैरे गोष्टींच्या विक्रीसाठी एक निराळा वार्षिक रुपये १०० फीचा स्वतंत्र परवाना ठेवण्यांत आलेला आहे. मुंबई, अहमदाबाद व सोलापूर येथें गिरणी मजुरांची वस्ती मोठी असल्यामुळें त्या शहरांत आसवांच्या व अरिष्टांच्या विक्रीसाठींसुद्धां जबर परवाना-फी कदाचित् सयुक्तिक असूं शकेल. परंतु पुण्याला कांहीं मजूरवस्तीचें प्राबल्य नाहीं. असें असतांना पुण्यालासुद्धां वरील औद्योगिक शहरांच्या दावणींत गोवून जबर फी बसविणें आजिबात योग्य नाहीं. वास्तविक पुण्यांतील लोकवस्ती, धंद्याचें मान व गिऱ्हाइकांचा वर्ग ह्यांचा विचार करतां वरील जबर फी देणें पुण्यांतील विक्रेत्यांना परवडणार नाहीं. पूना केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशननें ह्या बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन पुण्यांतील परवाना फी इतर जिल्हा-शहरांइतकीच ठेवावी अशी सूचना केली होती, परंतु मुंबई-प्रमाणेंच पुण्याला प्रोहिबिशन बॉर्डस आहेत ह्या लंगड्या सबबीवर सरकारनें असोसिएशनची न्याय्य मागणीही धुडकावून लावली आहे. म्हणून ह्या गोष्टीच्या निषेधार्थ असोसिएशनच्या सर्व सदस्यांनीं सरकार ह्या गोष्टीचा फेरविचार करीपर्यंत सदर परवाने घेऊं नयेत व त्यांचेखालीं येणाऱ्या पदार्थांची विक्री करूं नये असें २५ एप्रिलच्या सभेंत ठरविलें आहे. त्याचप्रमाणें सरकारनें कोणतीं पेयें 'मेडिकेटेड टॉनिक वाइन्स' मध्यें येतात तें ठरवून देऊन त्यांच्या विक्रीच्या प्रत्येक २४ औसांवर अडीच रुपये कर बसविला आहे. विक्रेते हा कर अर्थात् गिऱ्हाइकांपासूनच वसूल करणार. परंतु हा कर बसवितांना ह्या मेडिकेटेड वाइन्सचें मूळचें मुख्य गिऱ्हाईक कोण ? ही गोष्ट सरकारनें लक्षांत घेतलेली नाहीं. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं हेमोद्राक्षो-माल्टसारखीं अनेक आसवें व अरिष्टें घेणारा मोठा वर्ग आहे. हा वर्ग कांहीं दारू पिणाऱ्या लोकांचा वर्ग नाहीं. अशा स्थितींत नव्या सरकारी करापासून ह्या वर्गाला निष्कारण जबर भुर्दंड पडणार आहे. तेव्हां मद्यपानाची भूक भागविण्यासाठीं आसवें व अरिष्टें ह्यांचा उपयोग करण्यांत येऊं नये ह्यासाठीं हीं औषधें डॉक्टर-वैद्यांच्या प्रिस्क्रिप्शनांशिवाय विकण्यांत येऊं नयेत, अशी बंदी तेवढी घालण्यांत यावी, अशीहि सदर असोसिएशननें सूचना केली आहे.

( अरिष्टें आणि आसवें ह्यांच्या विक्रीसाठी परवाना फी मोठ्या शहरांत २५ रु. व इतर ठिकाणीं १५ रु. अशी आतां करण्यांत आली आहे. डॉक्टर व वैद्य ह्यांस येणारी अडचण दूर केली आहे. )

---

**कूळ व शेत-जमीन कायदा**

**१९४८**

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. ३ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्ज-निवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर.



### हिंद सरकारच्या वहातूक कंपन्या

आंतरराष्ट्रीय वहातुकीसाठीं हिंदुस्थान सरकारनें ३ आगबोट कंपन्या स्थापन करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी पहिली कंपनी मे च्या मध्याला मुंबईला स्थापन होईल. ह्या कंपनीची मॅनेजिंग एजन्सी शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीकडे रहाणार असून तिनें ऑस्ट्रेलिआ, 'आतिपूर्वेकडील देश, इत्यादि भागांत व्यापार वाढवावयाचा आहे. दुसऱ्या कंपनीकडे इंग्लंड आणि युरोप ह्यांच्याशीं चालणारा व्यापार सोपविण्यांत येणार आहे. तिसरी कंपनी उत्तर आणि दक्षिण अमेरिका ह्यांच्याशीं चालणाऱ्या व्यापाराकडे लक्ष देईल. दुसऱ्या कंपनीचा कारभार भारत कंपनी आणि तिसरीचा कारभार इंडिआ स्टीमशिप कंपनी पहाणार आहे. ह्या सर्व निम-सरकारी कंपन्यांचें भांडवल प्रत्येकीं १० कोटी रुपये रहाणार असून त्यांपैकी ५१ टक्के भांडवल सरकार घालणार आहे. उरलेल्यापैकी २६ टक्के मॅनेजिंग एजन्सीनें घालावयाचें असून २३ टक्के सार्वजनिक विक्रीसाठी राखुन ठेवलें जाईल. प्रत्येक कॉर्पोरेशनमध्यें ११ डायरेक्टर्स असतील. त्यांपैकी ६ सरकार नेमील; ते सरकारी अधिकारीच असतील असें नाहीं. सरकार-नियुक्त एका डायरेक्टरला कंपनीचें धोरण आंखण्याचें आणि खास हितसंबंधांचें संरक्षण करण्याचें काम करावें लागेल. तीन डायरेक्टरांची मॅनेजिंग एजंट नेमणूक करतील आणि दोन भागीदार निवडतील. कंपन्यांच्या भांडवलावर ३॥ टक्के नफा देण्याची हमी सरकार कांहीं वर्षांपुरती घेणार आहे, असें समजतें.

---

### अवजड शस्त्रांची निर्मिति

हिंदुस्थान सरकारचें संरक्षण खातें कांहीं परकीय कंपन्यांची मदत घेऊन देशांत अवजड शस्त्रास्त्रें तयार करण्याचे कारखाने काढणार आहे. शास्त्रीय आणि औद्योगिक खात्याचे चिटणीस डॉ. भाटनागर ह्यांनीं ही माहिती सांगितली. आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी औद्योगिक उत्पादन वाढविण्याची आधीच जय्यत तयारी असावी लागते; त्याशिवाय देशाचा बचाव करणें कठीण जातें. तथापि संरक्षक शस्त्रें निर्माण करण्यासाठी लागणारीं कांहीं खनिज द्रव्यें हिंदुस्थानांत मिळूं शकत नाहींत. त्यासाठी हिंदुस्थानची भूस्तर-विषयक तपासणी अधिक कसोशीनें करणें जरूर आहे. कोळशापासून जळाऊ तेल तयार करणें आणि पॉवर अल्कोहल तयार करणें ह्या बाबींकडे विशेष लक्ष द्यावयास पाहिजे. त्याचप्रमाणें सल्फ्युरिक ॲसिड आणि सल्फर ह्यांचीही निर्मिति करणें जरूर आहे. दंग्याधोप्याच्या वेळीं व लष्करासाठीही लागणाऱ्या अश्रुवायूच्या उत्पादनाकडेहि लक्ष द्यावयास पाहिजे. संरक्षणाची तयारी योग्य त्या पायावर उभारण्यासाठी ह्या रसायनांचें उत्पादन कमींत कमी खर्चांत होणें जरूर आहे. हिंदुस्थानचें औद्योगीकरण करतांना जरूर पडली तर ह्या उद्योगधंद्यांचा उपयोग बचावाच्या कामीं करता येईल अशी व्यवस्था प्रथमपासूनच करावयास पाहिजे, अशा आशयाचे विचार डॉ. भाटनागर ह्यांनीं व्यक्त केले आहेत.

---

### " वॉटरोलियम "

समुद्राच्या साध्या पाण्यापासून पेट्रोल तयार करण्याचा शोध मद्रासच्या श्री. रेड्डी ह्यांनीं लावल्याचें प्रसिद्ध झालें होतें व त्याची जाहिरातहि पुष्कळ झाली होती. पेट्रोलियमच्या धर्तीवर त्यांनीं आपल्या पदार्थाचें नांव "वॉटरोलियम" ठेवलें होतें. एंजिनच्या कोणत्याहि जळणांत कार्बनचा भाग असल्याखेरीज त्याचा उपयोग होऊं शकत नाहीं; तेव्हां साध्या पाण्यापासून बनविलेल्या "वॉटरोलियम" मध्यें कार्बन कसा सापडेल? असें भाष्य हिंद सरकारच्या उद्योग खात्याच्या एका प्रवक्त्यानें केलें आहे.


**शेअर्स विकणें आहेत**


कंपनीचें अधिकृत भांडवल ५ लाख रुपये असून, ५० चा एक, याप्रमाणें दहा हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलें आहे.
१ ल्या वर्षी कंपनीनें ३ टक्के डिव्हिडंड वाटला. तसेंच

**ठेवी स्वीकारणें आहेत.**

व्याज १ वर्षांच्या करारानें ४ टक्के
" २ वर्षांच्या " ४॥ टक्के
" ३ वर्षांच्या " ५ टक्के

लिहाः—डॅगो आयुर्वेदिक फार्मसी लि.
नातेंपुतें, (जि. सोलापूर)

**बेडेकर**
**लोणच्याचा तयार मसाला**




**कृष्णा शुगर मिल्स लि.**

**कृष्णा-कित्तूर**

**कन्फेक्शनरी सुरू झाली.**

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

**६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.**

विशेष माहितीसाठीं लिहा.

पोस्टः—कृष्णा-कित्तूर
जिल्हाः—बेळगांव.

**विंचूरकर ॲण्ड को.**
मॅनेजिंग एजण्टस्.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि घर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.